Literacy for a Billion

Movie: Aatamavishwas
Year: 1989

Song: Sanga majhya lekila ki yenar
Lyricist: Sudhir Moghe & Pravin Davane

सांगा माझ्या लेकीला की येणार मी
तुझ्यापोटी पुन्हा जन्म घेणार मी
सांगा माझ्या लेकीला की येणार मी
तुझ्यापोटी पुन्हा जन्म घेणार मी
तुझ्यापोटी पुन्हा जन्म घेणार मी

नऊ मास पोटी मी जपले तुला
तसे गडे सांभाळ आता तू मला
नऊ मास पोटी मी जपले तुला
तसे गडे सांभाळ आता तू मला
जसे मला छळलेस सुखविले तू
आता माझी पाळी नी सोसायचे तू
तुझ्या प्रेमाचा प्रसाद खाणार मी
तुझ्यापोटी पुन्हा जन्म घेणार मी

सांगा माझ्या लेकीला की येणार मी
तुझ्यापोटी पुन्हा जन्म घेणार मी

जोजविले अंगाई गाऊनी तुला
त्याच अंगाईने तू सुखवी मला
जोजविले अंगाई गाऊनी तुला
त्याच अंगाईने तू सुखवी मला
माय लेक एकाच नदीचे तीर
त्यांना जोडणारा हा मायेचा पुल
चिंब चिंब आनंदात न्हाणार मी
तुझ्यापोटी पुन्हा जन्म घेणार मी
सांगा माझ्या लेकीला की येणार मी
तुझ्यापोटी पुन्हा जन्म घेणार मी
तुझ्यापोटी पुन्हा जन्म घेणार मी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*